**दिवाणी कि.अर्ज क्र.७०१/२०२५.**

**नि.क्र.१८ खाली.**

**<u>गैरअर्जदार क्र. २ यांचा सरतपास शपथेवरती ॲड श्री.के.यु.इंगळे यांच्यामार्फत.</u>**

आता मला मी दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र दाखवले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो मी वाचलेला आहे. त्यावरती माझा निशाणी अंगठा आहे. त्यास नि.क्र.१८ देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>गैरअर्जदार क्र. २ यांचा उलटतपास ॲड श्री.एस.वाय.गुळवे यांच्यामार्फत.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, गोरक्षनाथ कृष्णा साखळे हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोरक्षनाथ यांचे वडील कृष्णा मारोती साखळे हे देखील दिनांक १८.०२.२०१५ रोजी मयत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयत गोरक्षनाथ हा पुजा हिचा पती होता. हे म्हणणे खरे आहे की, गोरक्षनाथ व पुजा यांना मुलबाळ नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मयत गोरक्षनाथ यांना मी व पुजा असे आम्ही दोनच वारस आहोत. अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जामध्ये कोणत्याही जमिनीचा उल्लेख केलेला आहे किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोरक्षनाथ यांच्या मिळकतीवर माझा व पुजा हिचा समान अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला असे वाटते की, पुजा हिस मुलबाळ नसल्याकारणाने तिला मिळकतीत अधिकार देऊ नये. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्विकृती,**

२३/०३/२६

**(ए. एच. तट्टु.)**

दिनांक २३.०३.२०२६.

३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सिल्लोड.